अनुभवपुष्पे

(चिंतनासाठी काही अनुभव-वचने)

भाग : २

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

अनुभवपुष्पे

भाग-२

(चिंतनासाठी काही अनुभव-वचने)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** अनुभवपुष्पे - भाग २ ***
पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑक्टोबर २०१६
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

आपलं जगणं म्हणजे देवानं मांडलेल्या विश्वाच्या संसारातला किंचितसा भाग आणि तोही काही काळ चालवण्याची संधी !

हा किंचितसा संसार करण्याची संधी हीसुद्धा, संसार करण्याची नसून, अनेकदा फक्त तो संसार 'आनंदानं पाहण्याचीच' असते!

यात कौतुक आणि अहंकाराला वावच नाही, हे लक्षात येईल, तो भाग्यवान !



देव त्यात्या माणसाच्या अंतिम हिताप्रमाणं देतो, म्हणून सुखही होतं आणि कल्याणही साधतं.

माणसाच्या संकुचित बुद्धीला हे कळत नाही. त्यामुळं माणूस त्याच्या मनाप्रमाणं मागतो.

मग ते सुखाचंही होत नाही आणि कल्याणाचंही !

यासाठी जर मागावं वाटलंच, तर हिताचं ते मागावं!



तसं तर सूर्यालाही जावं लागतं. पण, तो जगाच्या उपयोगासाठी चंद्रचांदण्यांची रात्र मागं ठेवून जातो.

त्यांनाही जावं लागतं, पण त्या जगासाठी उगवता सूर्य मागं ठेवून जातात.

आपल्यालाही जावं लागणार ! आपण जगाच्या उपयोगासाठी मागं काय ठेवून जाणार आहोत ?

आज संपर्कसाधनांनी माणसाला अतिवेगवान आणि अनेक प्रकारचे संपर्क दिले. पण दुसरीकडं त्याची प्रत्यक्ष जिवंत माणसाची गरज संपवून नकळत दुःखद एकाकीपणही दिलं ! ही अविवेकी बुद्धीची शोकांतिका आहे !

हे टाळायला साधनांचा विवेकी वापर, निसर्गानुकूल जीवन व उपासनेशिवाय पर्याय नाही !

जग आपल्यापरीनं व्यवस्थित चाललेलंच असतं. ज्यानं ते निर्माण केलं आणि त्याला ते जसं चालावं असं वाटतं तसं ते चालत असतं.

फक्त आपल्याला ते 'आपल्या मनाप्रमाणं' व्यवस्थित चाललेलं नाही, असं वाटतं म्हणून अस्वस्थता येते. हे कळलं तर तीही टळते !

मग देवाच्या जगात आपल्यालाही काम असतं, ते आनंदानं करावं !

ज्यांना जमतंय त्यांनी जगावंच, पण ज्यांना जमत नाही असं वाटतं त्यांनीही जगावंच.

कारण ज्यांना 'जमतंय असं वाटतं', त्यांनासुद्धा ते जमत असतंच असं नाही.

त्यातही, मुळात जगताना दोघांनीही हे लक्षात ठेवणं हिताचं की, हे दोघंही कसेही जगले तरी जगाला 'स्वतःला' जगणं जमतंच!

जगात आहोत तर प्रसंग येणारच. एक स्वतः सोडवावे तरी, नाहीतर सोपवावे तरी !

यांतलं काही केलं तरी चालतं. मार्ग निघतो.

नुकसान आहे ते दोलायमान, अधांतरी राहण्यात आणि वरच्यातलं धड काहीच न करण्यात !

तेवढं मात्र टाळावं !

आयुष्यात माणसाची मनानं,अयोग्य संस्कारानं अनेक नुकसानं होतात. त्यातलं एक असं आहे.

कुवतीप्रमाणं जास्तीत जास्त निकोप प्रगती आणि विघातक स्पर्धा - यांतला फरक न कळणं, यामुळं हे नुकसान होतं. ते व्यक्तींचंही आणि जगाचंही !

ते टाळायचं असलं तर सावधानता ठेवणं आपल्या हाती आहे !



निसर्ग आपल्याला असंख्य गोष्टी मुक्तपणे आणि मोफत देतो आहे.

त्याच्या देण्याच्या हेतूचं चीज करायचं असलं, तर आपल्याला मिळालेल्याचा सर्वांसाठी चांगल्यात चांगला उपयोग करावा ! असा उपयोग करण्यात आपलं नुकसान नाही आणि दिलेलं कमीही होत नाही.

उलट असा चांगला उपयोग करणाऱ्याला देव अधिक चांगलं देत असतो !



जगात सारी देवघेव असते. आपणही कधी देणारे, कधी घेणारे. जगाचा व्यवहार असाच चालायचा, एवढं शिकणं आणि त्याबद्दल कृतज्ञ राहण्यानं हा व्यवहार संपतो !

आजन्म ऋणी राहावं ते फक्त भगवंत, निसर्ग किंवा गुरूंचं !

कारण त्यांच्यात असली व्यवहारी, स्वार्थी देवघेव नसते !

विश्वपटलावर एक प्रदीर्घ ईश्वरी नाटक कधीपासूनच सुरू आहे आणि सुरू राहणार आहे. त्यात जीवजंतूंपासून माणसापर्यंत प्रत्येकाला भूमिका आहे.

त्यात स्वतःचं वेगळं नाटक सुरू न करता, ईश्वरी नाट्यातली आपली भूमिका करीत राहावं, असं ज्यांना वाटतं ते लोक परमार्थी !

त्यामुळं ते आनंदात राहू शकतात !

साध्या पिण्याच्या पाण्याच्या बाटलीचा उपयोग होण्यासाठी त्याचं बूच किंवा झाकण योग्य दिशेला फिरवून काढावं लागतं. मग प्रत्यक्ष पाणी प्यावं लागतं. तेव्हा शरीरातला जीव शांत होतो.

जगण्यातला कायमचा आनंद मिळवायचा, तर मग मन योग्य दिशेला फिरवण्याचे कष्ट घ्यायला नकोत का ?

स्वतः शरीरानं अस्तित्वात राहण्याची इच्छा आहे, तोवर पैशाचं फार महत्त्व वाटतं.

आपल्या नुसत्या अस्तित्वाचं महत्त्व वाटतं, तेव्हा पैशाचं महत्त्व आणखी कमी वाटतं.

तर जिथं फक्त अस्तित्वाचं महत्त्व उरतं तेव्हा पैशाचं महत्त्व संपतं !

नुसतं अस्तित्व म्हणजे भगवंत !



वयाला स्थान आहे. पण नुसत्या वयाला महत्त्व नाही.

व्यवहारात वेगवेगळ्या क्षेत्रांत अनुभव, सराव, रियाज- यांच्या वयाला महत्त्व असतं !

परमार्थातसुद्धा श्रद्धा, आज्ञापालन, अभिप्रेत साधना, वृत्तिपालट, खरी शरणागती - यांची वर्षं मोजायची. नुसत्या दीक्षा, अनुग्रह, उपदेश - यांची वयं काय कामाची ?





तुम्हाला खूप मौलिक आणि जगाला उपयोगी पडू शकेल असं काही प्रतिभासंपन्न आकलन झालं असेल तर ते मुक्तहस्तानं वाटून टाका! कारण ते ईश्वराचं आहे. असं वाटणं हे त्याचं चीज आहे !

तुम्ही जर त्याची मालमत्ता करून त्यावर पैसा, प्रसिद्धी - असं काही मिळवणार असाल, तर सावध !

तुमचं अस्वास्थ्य आणि विनाश यांची दारं तुम्ही स्वतः उघडलेली आहेत !



काही माणसांपेक्षा फळझाडंही बरी. आंब्याच्या झाडाला दगड लागला, तरी ते रागावून आपल्या डोक्यात फांदी फेकीत नाही. उलट एखादा पिकलेला आंबा ते तुम्हाला देईल.

माणसाची तीही खात्री नाही. वागताना 'चुकून चूक' झाली तरी, माणूस क्षमा करीलच असं नाही ! यातून काय ते शिकावं हे बरं !



वय जसं आपोआप वाढतं, तशी वयाबरोबर समजशक्ती, सहनशक्ती - अशा शक्ती वाढल्या असत्या तर, जग आहे त्यापेक्षा कितीतरी चांगलं आणि स्वास्थ्याचं झालं असतं !

पण या शक्तींची किंमत कळून, त्या मिळवणं निसर्गानं हेतुतः माणसाच्या हातात ठेवलं आहे !





अलीकडं विशिष्ट पदवी, पदविका असं शिक्षण झालेला तो सुशिक्षित, अशी समजूत झाली आहे आणि ते न झालेला तो अशिक्षित !

खरंतर कोणत्याही परिस्थितीत आपण आनंदानं कसं जगावं, हे ज्याला कळलं तो सुशिक्षित आणि ते जो शिकला नाही, तो अशिक्षित !

स्वास्थ्यासाठी हेच जास्त खरं आहे,असं आढळेल!





हा जन्म, हा आपला जगातला पहिला जन्म आहे म्हणणं बालबुद्धीचं आहे. आपल्याला पुन्हापुन्हा जन्माला यावं लागणार, असं वाटणं दुबळेपणाचं आहे.

पण खरा परमार्थ साधून आता पुन्हा परत जन्माला यावं लागणार नाही, असं म्हणणं सात्त्विक आत्मविश्वासाचं व कृपेच्या जाणिवेचं आहे !



महागाई अनेक क्षेत्रांत सतत, विलक्षण वाढते आहे. फक्त एक वस्तू मात्र अजूनही खूपच स्वस्त आणि भरपूर प्रमाणात कधीही उपलब्ध आहे. ती म्हणजे खऱ्या कामांच्या बाबतींतल्या अडचणी आणि सबबी यांच्या ढाली !

त्यांचा प्रपंचातही भरपूर खप आहे आणि 'स्वतःवर येणाऱ्या खऱ्या परमार्थात' तर त्याहीपेक्षा मोठा आहे !

आपण नामाला घरी कायमचं राहायला बोलवावं, अर्थात नित्यनेमानं नाम घ्यावं. म्हणजे नामाच्या पाहुण्यांना वेगळं बोलवावं लागत नाही !

सत्कर्मं, सत्संग, शुद्ध उपासक, शांती - असे नामाचे अनेक पाहुणे, न बोलावता अशा ठिकाणी येतात.

ते येतात तेव्हा स्वाभाविकपणे आपल्या नामाला बळ आणि आपल्याला आनंद देतात !

जिज्ञासू, मुमुक्षु, शिष्य, साधनी माणसांसाठी संत स्वाभाविकपणे राबतातच.

पण स्वार्थी, मतलबी, निंदक आणि अपरिपक्व माणसांसाठी अविरत राबणे, ही संतांची देहात आणि देह ठेवल्यावर सूक्ष्मातही चालणारी देवदत्त तपश्चर्या आहे !

तीही ते त्याच निष्ठेनं करीत असतात !

वृद्धांच्या प्रश्नांवर अलीकडं खूप चर्चा चालू आहेत. खरंतर, अनेक वृद्धांनी आत्मपरीक्षण केलं तर, आपण 'पक्व' आहोत पण 'परिपक्व' नाही, हे त्यांच्याच लक्षात येईल, तोच खरा प्रश्न आहे !

त्यांनी आजही जीवन शिकण्यासाठी नम्रतेनं सुरुवात केली, तर त्यांचे बरेच प्रश्न, त्यांच्याकडूनच कमी होऊन, ते आनंदी होतील आणि जगही !

माणसाच्या बुद्धीची आणि तर्काची मोठी गंमत आहे. फणसाच्या झाडाला आंब्याची फळं येण्याची अपेक्षा करणं, तो चूक मानतो.

पण स्वतःच्या कुठल्याही बेसावध, अयोग्य कर्मांना, सुखासमाधानाची फळं यावी, अशी अपेक्षा करणं मात्र तो बरोबर मानतो !

ही बुद्धीची फसगत लक्षात येईल तो सुदिन !



परमेश्वराची कृपा सर्वांवर आणि सारखीच असते. पण ती कळायला, त्याला पात्र व्हायला, ती दुसऱ्यावरही तेवढीच असते, हे समजून घ्यायला, त्या कृपेचा योग्य उपयोग करता यायला - मात्र प्रत्येकाला वेगवेगळी तयारी करावी लागते.

खरे गुरू ती तयारी तळमळीनं करून घेतात, हे त्यांचे खरे आणि न फिटणारे उपकार!



साधना बंद पडते, याची खंत वाटणारी माणसं पुण्याईचीच ! कारण ती बंद पडलेली त्यांना कळते, त्याची खंत वाटते, पुन्हा सुरू व्हावी म्हणून तळमळ वाटते, त्याचे उपाय शोधून ते पुन्हा प्रगतीला लागतात. याला गुरुकृपा, पुण्याईच लागते !

कारण ही तळमळ वाढूनच एके दिवशी साधना बंद पडणे, 'बंद पडेल' आणि नित्य अनुसंधान साधेल !

अतर्क्य घटना, अपयशं, दुःखं, फसवणुकी, अनपेक्षित उपकार - अशा अनेक रूपांनी स्वतःच्या संकुचित कल्पना व अहंकारापलीकडं जायच्या संधी आयुष्यात खूपदा येऊन जातात.

पण त्या ओळखण्याची तयारी, सावधानता, स्वतःला बदलण्याची नम्रता - अशा अनेक गुणांच्या अभावी, या संधी वाया जातात !

त्याबद्दल हळहळ वाटते ती मात्र गुरूंना आणि देवाला !

आयुष्यात फक्त एका संपर्क साधनाचं स्थान असलेल्या मोबाइलची, माणसाला एवढी निकड वाटते की,तो त्याची बॅटरी उतरू नये, बंद पडू नये म्हणून, इतक्या गडबडीतसुद्धा सावध असतो !

पण प्राणाएवढं स्थान असलेल्या उपासनेची बॅटरी उतरलीच नव्हे, बंद पडली तरी त्याचं त्याला भान नसतं !

ही कुवतीची कमतरता नाही, उपासनेच्या निकडीचा अभाव आहे !

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प : स्वरूप व पद्धती
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली
२१. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा :
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना :
३०. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १
३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा
३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ
३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश
४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत
४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)
४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)
५५. शिदोरी
५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २
५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २
६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी
६२. श्रद्धेची पहाट
६३. उपासनामाला

६४. पावनपथ
६५. अनुभवपुष्पे - भाग १
६६. कृतज्ञतामार्ग
६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी :
(मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)
६९. संतबोध : भाग ४
७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार
७१. उत्तरायण -भाग ३
७२. अनुभवपुष्पे - भाग २
७३. श्रद्धा
७४. अनुभवपुष्पे - भाग ३
७५. अर्घ्य
७६. जीवनचिंतन
७७. स्वास्थ्यसंवाद
७८. वचनांजली भाग १
७९. अक्षरायण
८०. वचनांजली भाग २
८१. भावगीता

अनुभवपुष्पे





संवेदनशील व सावध व्यक्तींना
जगण्याच्या शाळेत पदोपदी सुगंधी भेटी मिळतात.....
विशालता, सत्याची झलक, पुढच्या प्रगतीच्या दिशा
आणि बरंच काही...
ती देणारी असंख्य छोटी छोटी अनुभवपुष्पंही...
संस्मरणीय... !